# अमरावती महानगरपालिका, अमरावती

## दिनांक २४/०२/२०२५ रोजी प्राप्त तसेच
## दिनांक २४/०३/२०२५ रोजी मंजुर सर्वसाधारण सभा ठरावाची प्रत

### (प्रशासकीय विषय)

विषय क्रमांक २१७ – महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २ (१) (२) नुसार ठराव क्रमांक ४० व ४१ दि.०३.११.२०२२ दुरूस्त करणे बाबत.

ठराव क्रमांक २१७ – महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्कायसाईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ असे म्हणावे, सदर नियमातील २० (क) अन्वये परवाना शुल्क निश्चीत करण्याचे संदर्भात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३८६ (२) अंतर्गत महानगरपालिकेच्या मंजुर ठराव के ४० दि.०३.११.२०२२ खालील प्रमाणे दर निश्चीत करण्यात आले आहेत.

परवाना (जाहिरात) फी दरपत्रक

| अ. क्र. | जाहिरातीचा प्रकार | मोजमाप (चौरस फुट) | | परवाना फी (प्रति चौरस फूट प्रति माह करीता) |
|---|---|---|---|---|
| १ | फुग्यावरील जाहिरात | प्रति दिवस प्रति बलुन प्रमाणे | | रु.४००/- |
| २ | अ) फिरत्या वाहनावरील जाहिरात<br>ब) स्थिर वाहनावरील जाहिरात | प्रति दिवस प्रति वाहन प्रमाणे | सायकल रिक्षा | रु.५०/- प्रति दिवस |
| | | | तिन चाकी वाहन | रु.१००/- प्रति दिवस |
| | | | चार चाकी वाहन | रु.२००/- प्रति दिवस |
| ३ | तात्पुरते जाहिरात फलक (कालावधी जास्तीत जास्त ३ दिवसांकरीता) | नियमात नमुद साईज | १) ६ फुट x ३ फुट | रु.५०/- प्रति दिन |
| | | | २) ८ फुट x ३ फुट | रु.७५/- प्रति दिन |
| | | | ३) ८ फुट x ६ फुट | रु.१००/- प्रति दिन |
| ४ | वाहतुक थांब्यावरील जाहिरात | प्रति चौरस फुट प्रति माह प्रमाणे | | रु. ४/- |
| ५ | युनीपोल वरील जाहिरात | प्रति चौरस फुट प्रति माह प्रमाणे | | रु. १०/- |
| ६ | एलईडी/एलसीडी/न्युऑन साईन जाहिरात | प्रति चौरस फुट प्रति माह प्रमाणे | | रु. २०/- |
| ७ | गॅन्ट्री वरील जाहिरात | प्रति चौरस फुट प्रति माह प्रमाणे | | रु. १०/- |
| ८ | काचेच्या दर्शनी भागावरील जाहिरात | प्रति चौरस फुट प्रति माह प्रमाणे | | रु. ३/- |
| ९ | ग्लोमाईन वरील जाहिरात | प्रति चौरस फुट प्रति माह प्रमाणे | | रु. ५/- |
| १० | ग्राफिटी (भिंतीवरील रंगचित्र) जाहिरात | प्रति चौरस फुट प्रति माह प्रमाणे | | रु.७/- |
| ११ | किऑस्क वरील जाहिरात (विद्युत स्तंभ) (जमिनीपासुन १४ फुट उंच) | प्रति चौरस फुट प्रति माह प्रमाणे रुंदी ३ फुट लांबी ४ फुट | | रु.३०/- |
| १२ | लेझरद्वारे केलेली जाहिरात | प्रति चौरस फुट प्रति माह | | रु.३०/- |
| १३ | लॉलीपॉप वरील जाहिरात | प्रति चौरस फुट प्रति माह | | रु. ५/- |
| १४ | अ) आकाशचिन्ह जमिनीवरील<br>ब) आकाशचिन्ह इमारतीवरील | १० फुट x २० फुट<br>२० फुट x १० फुट<br>२० फुट x २० फुट<br>२० फुट x ३० फुट<br>२५ फुट x २५ फुट | | अ) रु.३/-<br>(कमर्शियल (मुख्य) परिसर सर्व साईज करीता) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ३० फुट x २० फुट<br>३० फुट x ३० फुट<br>४० फुट x १० फुट<br>४० फुट x २० फुट<br>४० फुट x ३० फुट<br>३० फुट x १५ फुट | ब) रु.२/-<br>(रेसिडेंशियल (आतील) सर्व साईज करीता)<br>टिपणा |

टीप:-

१. नियत साईज पेक्षा जास्त वाढ केल्याचे आढळुन आल्यास संबंधित जाहिरातीवर मुळ शुल्काच्या १०% प्रतिमाह प्रमाणे वाढ करण्यात येईल व विहीत मुदतीत दंड न भरल्या.. परवाना रद्द करण्यात येईल.

२ . सदर नियमातील २० (क) अन्वये सदर परवाना शुल्क आकारणी वरील वाढ दर तिन वर्षांनंतर १०% असेल.

३. सदर नियमातील २० (ख) अन्वये जर शुल्क विहीत कालावधीत प्रदान करण्यात आले नाही तर एक ते तिन महिन्याच्या विलंबा करीता परवाना शुल्काच्या १०% रकमेइतकी आणि तिन ते सहा महिन्याच्या विलंबा करीता २५% रकमेइतकी आपसमेळाची रक्कम देय असेल व सहा महिन्याच्या पुढे होणा-या विलंबा करीता परवाना रद्द करण्यात येईल.

४. सदर नियमातील ३ (७) अन्वये कोणताही जाहिरात फलक परवानगी न घेता बसविण्यात आला असेल असा कोणताही जाहिरात फलक आकारणीयोग्य फी च्या पाच पट इतकी प्रशमन फी आ..ारु न नियमीत करता येईल मात्र असा जाहिरात फलक किंवा जाहिरात ही या नियमाच्या तरतुदीनुसार असावी.

वरील प्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३८६ (२) अंतर्गत महानगरपालिकेच्या मंजुर ठराव क्रं ४० नुसार जाहिरात परवाना शुल्काचे दर व ठराव क्रं ४१ नुसार जाहिरात जागा भाडे निश्चीत करण्यात आले होते. सदर ठराव क्रं ४० व ४१ दि.०३.११.२०२२ मधील मंजुर दर शासनाचे नगरविकास विभागाने निर्गमीत केलेल्या अधिसुचनेच्या दिनांकापासुन दि.०९ मे २०२२ पासुन लागू राहतील या करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण २ एक (र) नुसार दुरूस्तीचा ठराव मा. सर्वसाधारण सभेच्या मंजुरी करीता सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

स्वा./-
नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती

स्वा./-
प्रशासक
महानगरपालिका,अमरावती

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती